नांदेड शहरातील मदिना नगर येथील मदिना तुल उलूम शाळे जवळील सर्वे नं.१२६९२ येथील महानगर पालिकेच्या मालकीच्या भूखंडावर उर्दू घर बांधण्याचा रु.८१६.०० लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.....

# महाराष्ट्र शासन

## अल्पसंख्याक विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः नांउघ २०१३/प्र.क्र.१२६/कार्या-४,**

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक,

मंत्रालय, मुंबई

तारीख: ४ फेब्रुवारी, २०१४.

वाचा —

१) जिल्हाधिकारी, नांदेड यांचे जा.क्र. २०१३/ मशाका-२/ जमीन/ टे-२/ कावि, शाखा महसूल-२, दि.०६/०५/२०१३ चे पत्र.

२) शासन पत्र, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.बीडीजी २०१४/प्र.क्र.३/इमारती-१, दि.२१/०१/२०१४.

**प्रस्तावना**

जिल्हाधिकारी, नांदेड यांनी त्यांच्या उपरोल्लेखित पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन, मदिना नगर, नांदेड येथील मदिना तुल उलूम शाळे जवळील सर्वे नं.१२६९२ येथील महानगर पालिकेच्या मालकीच्या भूखंडावर उर्दू घर बांधण्याच्या रु.८,१६,००,०००/- (रुपये आठ कोटी सोळा लक्ष फक्त) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.३ जानेवारी, २०१४ रोजी पार पडलेल्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन, मदिना नगर, नांदेड येथील मदिना तुल उलूम शाळे जवळील सर्वे नं.१२६९२ येथील महानगर पालिकेच्या मालकीच्या भूखंडावर उर्दू घर बांधण्याचा अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय**

नांदेड शहरातील मदिना नगर येथील मदिना तुल उलूम शाळे जवळील सर्वे नं.१२६९२ येथील महानगर पालिकेच्या मालकीच्या भूखंडावर उर्दू घर बांधण्याच्या रु.८,१६,००,०००/- (रुपये आठ कोटी

सोळा लक्ष फक्त) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीचा तपशील पुढील प्रमाणे आहे -

अ) आवश्यक बाबी :

| अ.क्र. | कामाचे नाव | परिमाण/किंमत |
|---|---|---|
| १ | मुख्य इमारत (तळ मजला) | |
| | इमारतीचे क्षेत्रफळ (चौरस मीटर) | १८१७ चौ.मी. |
| | प्रति चौरस मीटर बांधकामाचा दर | रु.२१,७९५/- |
| | बांधकामाची किंमत | रु.३,९६,००,०००/- |
| २ | विद्युतीकरण | |
| | अ) बाह्य (स्ट्रीट लाईट, एम.एस.ई.बी. चार्जेस, डी.जी. सेट) | रु.४०,००,०००/- |
| | ब) अंतर्गत (११ टक्के) | रु.४३,५६,०००/- |
| ३ | पाणी पुरवठा व स्वच्छता (८ टक्के) | रु.३१,६८,०००/- |
| ४ | संरक्षक भिंत (कम्पाऊंड वॉल) आणि द्वार | रु.४१,००,०००/- |
| ५ | नकाशा (ले-आऊट) अनुसार अंतर्गत रस्ते | रु.२१,००,०००/- |
| ६ | सौर उर्जा प्रणाली | ० |
| ७ | फर्निचर — किमान (रु.६,६००/चौ.मी.) | रु.१,२०,००,०००/- |
| ८ | पार्किंग व्यवस्था | रु.२०,००,०००/- |
| ९ | रेन वॉटर हार्वेस्टिंग | रु.५,००,०००/- |
| १० | अग्निशमन यंत्रणा (फायर फाईटिंग अरेन्जमेंट) (७ टक्के) | रु.६,००,०००/- |
| ११ | एलिवेशन ट्रीटमेंट | रु.२०,००,०००/- |
| १२ | माहिती फलक (सायनेज) (अंतर्गत व बाह्य) | ० |
| | **एकूण (अ)** | **रु.७,४४,२४,०००/-** |
| १३ | आकस्मिकता (४ टक्के) | रु.२९,७६,०००/- |
| | **एकूण (ब)** | **रु.७,७४,००,०००/-** |
| | **आवश्यक बाबींचे प्रति चौरस मीटर दर** | **रु.४२,६००/-** |

**ब) सहाय्यभूत बाबी :**

| अ.क्र. | कामाचे नावं | किंमत |
|---|---|---|
| १ | क्षेत्र विकास/खुल्या जागेवरील फरसबंदी | ० |
| २ | मुख्य जल साठा आणि पंप हाऊस / बोर वेल / जीएसआर | रु.५,००,०००/- |
| ३ | सभागृह आणि व्हीआयपी विश्रामगृहासाठी वातानुकुलित यंत्रणा | रु.२७,००,०००/- |
| ४ | उद्वाहन | ० |
| ५ | अतिरिक्त फर्निचर (अधिकारी कक्ष, बैठक व्यवस्था) | ० |

| अ.क्र. | कामाचे नावं | किंमत |
|---|---|---|
| ६ | दृक-श्राव्य कक्ष (ऑडियो-व्हीजुअल रुम) | ० |
| ७ | वृक्ष-विज्ञान आणि बाग काम (आरबोरीकल्चर आणि गार्डनिंग) | रु.१०,००,०००/- |
| | **एकूण (क)** | **रु.४२,००,०००/-** |
| | **प्रकल्पाची एकूण किंमत (ब + क)** | **रु.८,१६,००,०००/-** |
| | **एकूण प्रति चौरस मीटर दर** | **रु.४४,९०९/-** |

सदर प्रकरणी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडई-१ - २२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण - २०० - इतर कार्यक्रम - राज्य योजनांतर्गत योजना - (००) - (००) (१८) - उर्दु घरासाठी सहायक अनुदाने (२२३५ ए ५५२) या लेखा शिर्षाखाली टाकण्यात यावा व त्याखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२०४१६२७५४९०१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anees Iqbal Ismail Shaikh

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MDD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2014.02.04 16:31:22 +05'30'

**( अनिस शेख )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल-१/२ ( लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
२. आयुक्त, औरंगाबाद महसूल विभाग, औरंगाबाद,
३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी, नांदेड,
४. आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड,
५. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड,
८. अधीक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी, मुंबई,
९. खाजगी सचिव, मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (अ.वि.वि.) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,

१०.स्वीय सहायक, प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

११.स्वीय सहायक, सह सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१२.स्वीय सहायक, उप सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१३.कक्ष अधिकारी (का-७). अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१४.वित्त विभाग / नियोजन विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

१५.निवड नस्ती (का-४)/कार्यासन-४, संग्रहार्थ.